नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | अंक - २७१ | वार शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६ | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | पाने - ४ | किंमत - ४.०० रुपये | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
Year - 3rd | Issue - 271 | Blow- Friday Date 20 February 2026 | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | Pages - 4 | Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात मतदार यादीच्या विशेष पडताळणी प्रक्रियेला सुरुवात

## केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य निवडणूक आयोगाला दिले निर्देश


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली: एप्रिल २०२६ पासून मतदार यादीच्या विशेष पडताळणी प्रक्रियेला (डखठ) सुरुवात होणार आहे. या प्रक्रियेशी संबंधित तयारीचे कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य निवडणूक आयोगाच्या मुख्य अधिकाऱ्यांना गुरुवारी दिले.

महाराष्ट्रासोबत आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, चंदीगड, दादर आणि नगर हवेली, दमण- दीव, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, कर्नाटक, लडाख, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, दिल्ली, ओडिशा, पंजाब, सिक्कीम, त्रिपुरा, तेलंगणा आणि उत्तराखंड या २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एसआयआर राबवली जाणार आहे.

या पत्रात म्हटले की, निवडणूक आयोगाने गेल्या वर्षी २४ जून रोजी संपूर्ण देशात एसआयआर राबवले जाईल असा आदेश दिला होता. दरम्यान बिहारनंतर देशातील १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये २८ ऑक्टोबर २०२५ पासून ही प्रक्रिया सुरु आहे.

या प्रक्रियेत मतदार यादी अद्ययावत केली जात आहे. नवीन मतदारांची नावे जोडली जात आहेत. तसेच नावे वगळली जात आहेत आणि मतदार यादीतील चुका सुधारल्या जात आहेत.



# मुंबई विमानतळावर मोठी कारवाई; हिरे, सोनं अन् कोट्यवधींचे अमली पदार्थ जप्त, ८ जणांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत (चींलरळ) देश-विदेशातून येणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. तर, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरही प्रवाशांची नेहमीच वर्दळ असते. त्यामुळे, मोठी सुरक्षा यंत्रणा देखील येथे कार्यरत असल्याचं दिसून येतं. त्याच पार्श्वभूमीवर मुंबई विमानतळावर अनेकदा तपासणीत अंमली पदार्थ किंवा तस्करीचे सोनं (त्रेथ्रव) आढळून येतं. नुकतेच, ४ ते ११ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कस्टम विभागाने मोठी कारवाई करत कोट्यवधिचं साहित्य जप्त केलं आहे. याप्रकरणी, ८ जणांना अटकही करण्यात आलीय.

मुंबई कस्टम झोन - ३ (एअरपोर्ट) यांनी मोठी कारवाई करत विविध प्रकरणांत मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ, हिरे, सोने आणि परकीय चलन जप्त केले आहे. या कारवाईत एकूण ८ प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. कस्टम्सकडून मिळालेल्या माहितीनुसार, कारवाई जवळपास १६.७ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ, ३८ लाख रुपयांचे हिरे, १५ लाख रुपयांचं सोनं आणि विविध प्रकरणात



१.१३ कोटी रुपयांचे परकीय चलन असा मोठा ऐवज जप्त करण्यात आला आहे. सुमारे १६.७५६ किलो संशयित एनडीपीएस (हायड्रोपोनिक वीड) जप्त करण्यात आले असून त्याची अंदाजे किंमत ₹१६.७५६ कोटी इतकी आहे. तसेच २४६.७५ कॅरेट नैसर्गिक व लॅब-ग्रोउन हिरे जप्त करण्यात आले असून त्यांची किंमत सुमारे ₹३८.२८ लाख आहे. याशिवाय १०४ ग्रॅम २४ कॅरेट सोने जप्त करण्यात आले असून त्याची किंमत अंदाजे ₹१५.२४ लाख आहे. विविध प्रकरणांत मिळून ₹१.१३ कोटींचे परकीय चलन देखील जप्त करण्यात आले आहे.

दरम्यान, कस्टम्स विभागाकडून विमानतळावर तस्करीविरोधातील कारवाई अधिक तीव्र करण्यात आली असून संबंधित प्रवाशांविरुद्ध एनडीपीएस व कस्टम्स कायद्यांतर्गत पुढील तपास सुरू आहे.

# गडचिरोलीतील दहशतीचे ४४ स्मारके सुरक्षा दलाकडून उद्ध्वस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यात माओवाद्यांच्या दहशतीचे प्रतीक म्हणून उभारण्यात आलेली उरलेली शेवटची ४४ स्मारके सुरक्षा दलांनी यशस्वीरित्या उद्ध्वस्त केली. याबद्दल गडचिरोलीतील पोलीस दलाचे मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी अभिनंदन केले. पोलिसांची ही कारवाई केवळ भौतिक संरचना हटवण्यापुरती मर्यादित नसून, अनेक वर्षे जनतेच्या मनावर निर्माण झालेल्या भीतीच्या मानसिकतेवर लोकशाहीने मिळवलेला निर्णायक विजय आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

माओवाद्यांकडून दुर्गम आणि अतिदुर्गम भागात स्मारके उभारली गेली होती, ज्यांचा उद्देश स्थानिक नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणे आणि आपले अस्तित्व दाखवणे हा होता. मात्र, शासनाच्या सातत्यपूर्ण आणि ठाम माओवादविरोधी धोरणामुळे गडचिरोलीतील परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. सुरक्षा कारवाया, आत्मसमर्पण धोरण, विकास प्रकल्प आणि स्थानिक जनतेचा विश्वास वाढला आहे.

याच पार्श्वभूमीवर, गडचिरोली पोलीस दल, सी-६० कमांडो, सीआरपीएफ आणि विशेष पथकांच्या संयुक्त मोहिमेत सुमारे ८०० जवानांनी नियोजनबद्ध शोध आणि तपासणी मोहीम राबवली. बीडीडीएस पथकाच्या तपासणीनंतर विविध जंगल परिसरातील ही ४४ स्मारके नेस्तनाबूत केली. एटापल्ली, हेडरी, भामरागड, जिमलगट्टा, धानोरा आणि पेंढरी उपविभागांतील ही कारवाई विशेषतः संवेदनशील भागात पार पडली. जिथे पूर्वी दहशतीचे प्रतीक उभे होते, तिथे आता प्रशासनावरील विश्वास आणि विकासाची आशा निर्माण झाली आहे.

ही कारवाई गडचिरोलीतील बदलत्या वास्तवाचे प्रतीक आहे. भीतीपासून विश्वासाकडे, हिंसेपासून विकासाकडे होणाऱ्या संक्रमणाचा हा निर्णायक टप्पा आहे.

# अजित पवारांच्या विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल 30 दिवसांत येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बारामती येथे २८ जानेवारी रोजी झालेल्या 'लिअरजेट ४५' या विमान अपघाताच्या तांत्रिक तपासाला वेग आला असून, 'ब्लॅक बॉक्स'मधील महत्त्वाची माहिती संकलित करण्यात तपास यंत्रणेला यश आले आहे. जळालेल्या 'कॉकपिट व्हाईस रेकॉर्डर'मधील (सीव्हीआर)

> **'ब्लॅक बॉक्स'मधील माहिती संकलित; 'सीव्हीआर'मधील डेटा मिळवण्यासाठी अमेरिकेची मदत घेणार**

डेटा मिळवण्यासाठी अमेरिकेतील तज्ज्ञांची मदत घेतली जाणार असून, अपघाताचा प्राथमिक अहवाल ३० दिवसांच्या आत प्रसिद्ध केला जाईल, अशी माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने गुरुवारी दिली.

विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी कडून आंतरराष्ट्रीय मानकांनुसार या अपघाताचा सखोल तपास सुरू आहे. विमानातील 'डिजिटल फ्लाइट डेटा रेकॉर्डर' हा 'एल३हॅरिस टेक्नॉलॉजीज' (पूर्वी एल-३ कम्युनिकेशन्स) कंपनीचा असून, त्यातील माहिती दिल्लीतील प्रयोगशाळेत यशस्वीपणे डाउनलोड करण्यात आली आहे. मात्र, हनीवेल कंपनीच्या 'सीव्हीआर'ला आगीमुळे गंभीर नुकसान (थर्मल डॅमेज) झाले आहे. त्यामुळे संबंधित उपकरण ज्या देशात तयार झाले आहे त्या 'स्टेट ऑफ डिझाईन' देशातील तज्ज्ञांशी तांत्रिक मदतीसाठी संपर्क साधण्यात आला आहे. अपघाताच्या कारणांचा उलगडा करण्यासाठी आवश्यक सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून ३० दिवसांत प्राथमिक अहवाल जाहीर करण्यात येईल, असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. 'व्हीएसआर व्हेंचर्स' रडारवर या भीषण दुर्घटनेनंतर 'व्हीएसआर व्हेंचर्स' ही कंपनी डिजीसीएच्या रडारवर आली आहे. २०२५ मध्ये या कंपनीचे अनेकदा ऑडिट करण्यात आले होते. तरीही अपघात झाल्याने ४ फेब्रुवारीपासून कंपनीचे विशेष ऑडिट सुरू करण्यात आले आहे. या विशेष तपासणीत कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, विमानांची देखभाल-दुरुस्ती प्रक्रिया आणि सुरक्षा व्यवस्थापन



प्रणाली (डचड) यांची सखोल छाननी केली जात आहे. - दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्र सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. देशातील 'व्हीआयपी' आणि 'व्हीव्हीआयपी' प्रवाशांची ने-आण करणाऱ्या इतर महत्त्वाच्या खाजगी विमान कंपन्या तसेच संबंधित विमानतळांचेही विशेष ऑडिट करण्याचे आदेश मंत्रालयाने दिले आहेत. अफवांवर विश्वास ठेवू नका दरम्यान, या प्रकरणी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन मंत्रालयाने केले आहे. हा तपास पूर्णपणे तांत्रिक पुराव्यांवर आधारित असून, अपघातस्थळावरील ढिगाऱ्याचे परीक्षण तसेच देखभाल नोंदींची तपासणी युद्धपातळीवर सुरू आहे. तपास पूर्ण होईपर्यंत कोणतेही तर्क-वितर्क लढवू नयेत, असे मंत्रालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

# राज्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष करून मोफत देणग्यांची घोषणा नुकसानदायक : सुप्रिम कोर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने मोफत देणग्यांच्या संस्कृतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले की, जर सरकार सकाळपासून संध्याकाळपर्यंत मोफत अन्न, गॅस आणि वीज देत राहिले तर लोक काम का करतील? यामुळे काम करण्याची सवय नष्ट होईल. सरकारने रोजगार देण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. न्यायालयाने म्हटले की गरिबांना मदत करणे समजण्यासारखे असले तरी, भेदभाव न करता सर्वांना मोफत सेवा देणे योग्य नाही. ग्राहकांच्या आर्थिक स्थितीकडे दुर्लक्ष करून सर्वांना मोफत वीज देण्याचा प्रस्ताव असलेल्या तामिळनाडू पॉवर डिस्ट्रिब्युशन कॉर्पोरेशन लिमिटेडने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठाने म्हटले की देशातील बहुतेक राज्ये महसुलात तूट आहेत, तरीही ते विकासाकडे दुर्लक्ष करून मोफत देणग्यांची घोषणा करत आहेत.



न्यायालयाने केंद्र सरकारला विचारले, या लोकांना मुख्य प्रवाहात समाजात समाविष्ट करण्याऐवजी, मोफत योजना राबवून तुम्ही परजीवींची पिढी निर्माण करत नाही का?

**किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव साजरा**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# छत्रपती शिवरायांच्या मार्गावर चालणे हाच विकासाचा खरा मार्ग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे (जिमाका) : छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा हा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा



पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अभिनेता रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोलही वेगळा असता असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक राजे-रजवाडे मोगलांच्या अधिपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडविलेल्या छत्रपती शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. छत्रपती शिवरायांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. 'हे माझे राज्य नसून रयतेचे राज्य आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. देव, देश आणि धर्मासाठी लढा देण्याची प्रेरणा देत त्यांनी सामान्य जनतेला मोगलांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले. त्यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील, अन्याय-अत्याचार होणार नाहीत, अशी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यकारभारात विविध सुधारणा करताना शिवाजी महाराजांनी सुमारे ५० प्रकारचे कर रद्द करून सुटसुटीत करप्रणाली निर्माण केली. पाणी, जंगल यांचे नियोजन केले. भविष्यातील धोका ओळखून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना रोखण्यासाठी जलदुर्ग उभारले. पोर्तुगीजांवर विजय मिळवून पश्चिम किनारपट्टी सुरक्षित केली. छत्रपतींच्या कारकिर्दीत समुद्रमार्गे आक्रमण करण्याची हिंमत कुणालाही झाली नाही, अशा शब्दात त्यांनी महाराजांचे द्रष्टेपण मांडले.

शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष राज्यातील गड किल्ले देत असल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, पंतप्रधानांच्या पुढाकाराने शिवनेरीसह छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले असून २७ देशांनी एकमताने त्यास मान्यता दिली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी संबंधित प्रमाणपत्र स्वीकारले. त्यामुळे शिवरायांचे किल्ले आता अधिकृतपणे जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरवले गेले आहेत. शिवरायांच्या कार्याची साक्ष असलेले राज्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठा सेवा संघाच्या निवेदनावर राज्य सरकार सकारात्मक काम करेल, तसेच मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांवर विचार करण्यात येईल, अशी ग्वाही देऊन मुख्यमंत्री फडणवीस राज्यातील आणि जगभरातील शिवप्रेमींना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

**शिवरायांच्या विचारावर चालणारा बलशाली महाराष्ट्र घडवू- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. त्यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले स्वराज्य आजही सुशासनाची प्रेरणा देते. शिवरायांच्या विचारांवर चालत बलशाली व स्वाभिमानी महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

महाराजांनी जलव्यवस्था, अर्थकारण व पर्यावरण रक्षणाच्या संकल्पना चारशे वर्षांपूर्वीच राबवल्या. 'शिवराई' ही चलन व्यवस्था त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील गड-किल्लयांचे जतन व संवर्धन अधिक वेगाने करण्यात येईल. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त किल्ले स्वच्छता व जतन मोहीम राबविण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांप्रती महाराजांच्या संवेदनशील धोरणांचा उल्लेख करत बळीराजाला सक्षम करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. स्त्रीसन्मानाची परंपरा जपत 'लाडकी बहीण' योजनेद्वारे महिलांना सक्षम करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जुन्नर तालुका व शिवनेरी किल्ला परिसराच्या विकासाला प्राधान्य देऊन प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

**शिवनेरी किल्ला विचार आणि कार्याचे प्रेरणास्थळ- उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी शिवनेरी किल्ला, ही शिवजन्मभूमी केवळ ऐतिहासिक स्थळ नव्हते, (पान ३ वर..)

## संपादकीय....

### अहवालाची प्रतीक्षा

बारामती येथे २८ जानेवारी रोजी झालेल्या 'लिअरजेट ४५' या विमान अपघाताच्या तांत्रिक तपासाला वेग आला असून, 'ब्लॅक बॉक्स'मधील महत्त्वाची माहिती संकलित करण्यात तपास यंत्रणेला यश आले आहे. जळालेल्या 'कॉकपिट व्हाईस रेकॉर्डर'मधील (सीव्हीआर्) डेटा मिळवण्यासाठी अमेरिकेतील तज्ज्ञांची मदत घेतली जाणार असून, अपघाताचा प्राथमिक अहवाल ३० दिवसांच्या आत प्रसिद्ध केला जाईल, अशी माहिती नुकतेच नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने दिली. विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी कडून आंतरराष्ट्रीय मानकांनुसार या अपघाताचा सखोल तपास सुरू आहे. विमानातील 'डिजिटल फ्लाइट डेटा रेकॉर्डर' हा 'एल३हॅरिस टेक्नॉलॉजीज' (पूर्वी एल-३ कम्युनिकेशन्स) कंपनीचा असून, त्यातील माहिती दिल्लीतील प्रयोगशाळेत यशस्वीपणे डाउनलोड करण्यात आली आहे. मात्र, हनीवेल कंपनीच्या 'सीव्हीआर'ला आगीमुळे गंभीर नुकसान (थर्मल डॅमेज) झाले आहे. त्यामुळे संबंधित उपकरण ज्या देशात तयार झाले आहे त्या 'स्टेट ऑफ डिझाईन' देशातील तज्ज्ञांशी तांत्रिक मदतीसाठी संपर्क साधण्यात आला आहे. अपघाताच्या कारणांचा उलगडा करण्यासाठी आवश्यक सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून ३० दिवसांत प्राथमिक अहवाल जाहीर करण्यात येईल, असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. 'व्हीएसआर व्हेंचर्स' रडारवर या भीषण दुर्घटनेनंतर 'व्हीएसआर व्हेंचर्स' ही कंपनी डिजीसीएच्या रडारवर आली आहे. २०२५ मध्ये या कंपनीचे अनेकदा ऑडिट करण्यात आले होते. तरीही अपघात झाल्याने ४ फेब्रुवारीपासून कंपनीचे विशेष ऑडिट सुरू करण्यात आले आहे. या विशेष तपासणीत कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, विमानांची देखभाल-दुरुस्ती प्रक्रिया आणि सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली (ड्चड) यांची सखोल छाननी केली जात आहे. - दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्र सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. देशातील 'व्हीआयपी' आणि 'व्हीव्हीआयपी' प्रवाशांची ने-आण करणाऱ्या इतर महत्त्वाच्या खाजगी विमान कंपन्या तसेच संबंधित विमानतळांचेही विशेष ऑडिट करण्याचे आदेश मंत्रालयाने दिले आहेत. अफवांवर विश्वास ठेवू नका दरम्यान, या प्रकरणी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन मंत्रालयाने केले आहे.

# छत्रपतींचा विचार : स्वराज्याची जाणीव, जबाबदारीची प्रेरणा





– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इतिहासातील काही व्यक्तिमत्त्वे केवळ एका काळापुरती मर्यादित राहत नाहीत; ती युगांना दिशा देतात, मनांना चेतना देतात आणि राष्ट्राच्या आत्म्यात कायमची घर करून राहतात. अशा तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, धैर्य, दूरदृष्टी आणि लोकाभिमुख राज्यकारभाराचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज. त्यांची जयंती हा केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो आत्मपरीक्षणाचा, प्रेरणा घेण्याचा आणि आजच्या भारताला आवश्यक असलेल्या मूल्यांची उजळणी करण्याचा दिवस आहे. शिवाजी महाराजांचा जन्म हा एका सामान्य घराण्यात झाला, पण त्यांच्या विचारांची आणि कर्तृत्वाची उंची असामान्य होती. त्यांनी पाहिलेला समाज गुलामीच्या सावटाखाली दबलेला होता. अन्याय, अत्याचार, भीती आणि असुरक्षितता हेच सामान्य माणसाचे वास्तव झाले होते. अशा वेळी स्वराज्याची संकल्पना मांडणे ही केवळ राजकीय बंडाची घोषणा नव्हती; ती माणसाच्या सन्मानासाठी उभी केलेली चळवळ होती. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे हा त्यांचा विचार आजही प्रत्येक नागरिकाच्या मनात स्वाभिमानाचा दीप प्रज्वलित करतो.

शिवाजी महाराजांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी स्वराज्याची उभारणी तलवारीच्या जोरावरच केली नाही; तर लोकांच्या विश्वासावर केली. त्यांच्या सैन्यात सर्व जाती-धर्मातील माणसे होती. कर्तृत्व, निष्ठा आणि शौर्य यांना त्यांनी प्राधान्य दिले. समाजातील प्रत्येक घटकाला त्यांनी स्वराज्याच्या कार्यात सहभागी करून घेतले. त्यामुळे त्यांचे स्वराज्य हे केवळ राजकीय सत्ता नव्हते; ते लोकसहभागातून उभे राहिलेले लोकांचे राज्य होते. आजच्या काळात आपण लोकशाहीचे गोडवे गातो; पण लोकशाहीचा खरा आत्मा काय आहे, हे शिवाजी महाराजांच्या कार्यपद्धतीत स्पष्ट दिसते. त्यांनी प्रजेचे रक्षण हे राज्यकर्त्याचे सर्वोच्च कर्तव्य मानले. स्त्रियांच्या सन्मानाबाबत त्यांनी कठोर धोरण ठेवले. शत्रूच्या प्रदेशातही स्त्रियांवर किंवा निरपराध लोकांवर अन्याय होऊ नये, याची त्यांनी विशेष काळजी घेतली. युद्ध जिंकण्याइतकेच मानवता जपणे महत्त्वाचे आहे, हा संदेश त्यांनी आचरणातून दिला.

शिवाजी महाराजांचे युद्धतंत्र हे केवळ शौर्यावर आधारित नव्हते; ते बुद्धिमत्ता, नियोजन आणि परिस्थितीचा अचूक अभ्यास यांवर आधारलेले होते. गनिमी कावा ही त्यांची रणनीती आजही व्यवस्थापनशास्त्रात अभ्यासली जाते. कमी संसाधनांत मोठे यश मिळवायचे असेल, तर नियोजन, वेग आणि अचूक अंमलबजावणी आवश्यक असते, हे त्यांनी दाखवून दिले. डोंगरकिल्ले, आरमार, गुप्तहेर व्यवस्था, दळणवळण यांची उभारणी करून त्यांनी एक सक्षम सुरक्षा यंत्रणा उभी केली. परंतु शिवाजी महाराजांचा वारसा फक्त युद्धकौशल्यापुरता मर्यादित ठेवणे ही मोठी चूक ठरेल. ते दूरदर्शी प्रशासक होते. महसूलव्यवस्था, न्यायदान, किल्ले व्यवस्थापन, व्यापारसंरक्षण, समुद्री सुरक्षा अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी सुधारणा केल्या. त्यांनी शेतकऱ्यांचे हित जपले. पिकांची नासधूस होऊ नये म्हणून सैन्याला कडक सूचना दिल्या. कररचना सुबक आणि न्याय्य ठेवण्याचा प्रयत्न केला. राज्यकारभार हा प्रजेच्या कल्याणासाठी असतो, हे त्यांनी कृतीतून सिद्ध केले.


आज आपण विकास, सुशासन, पारदर्शकता याबद्दल बोलतो. पण या संकल्पनांची बीजे शिवकालीन राज्यव्यवस्थेत स्पष्ट दिसतात. भ्रष्टाचार, लाचलुचपत, सत्तेचा गैरवापर यांना त्यांनी कठोर विरोध केला. अधिकाराबरोबर जबाबदारी ही असलीच पाहिजे, हा संदेश त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिला. म्हणूनच त्यांचे प्रशासन जनतेला आपले वाटले. शिवाजी महाराजांची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे धार्मिक सहिष्णुता. त्यांनी कोणत्याही धर्माचा द्वेष केला नाही. त्यांच्या दरबारात विविध धर्मांचे लोक सन्मानाने वावरत होते. मंदिरांचे संरक्षण त्यांनी केले, तसेच मशिदींचा आदरही राखला. धर्माच्या नावावर माणसांमध्ये भिंती उभ्या करणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. न्याय आणि मानवता हेच त्यांच्या राज्यधर्माचे आधारस्तंभ होते.

आजच्या ध्रुवीकरणाच्या आणि तणावाच्या वातावरणात हा विचार अधिकच महत्त्वाचा ठरतो. शिवाजी महाराजांचा वारसा म्हणजे समावेशकता, सन्मान आणि सहअस्तित्व. त्यांच्या नावाचा वापर जर फूट पाडण्यासाठी केला गेला, तर तो त्यांच्या विचारांचा अपमान ठरेल. त्यांची जयंती साजरी करताना हा आत्मा जपणे आवश्यक आहे. दुर्दैवाने, आज अनेकदा शिवाजी महाराजांचे नाव घोषणांमध्ये, राजकीय भाषणांत आणि सोशल मीडियातील वादांत जास्त दिसते; पण त्यांच्या विचारांचे अनुकरण व्यवहारात कमी दिसते. किल्ल्यांवर गर्दी होते, पण कर्तव्यभावनेची उणीव जाणवते. त्यांच्या प्रतिमांना हार अर्पण केले जातात, पण त्यांच्या तत्त्वांना कृतीत स्थान दिले जात नाही. हा विरोधाभास आपण ओळखला पाहिजे. शिवाजी महाराजांचा खरा सन्मान म्हणजे प्रामाणिकपणे काम करणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, स्त्रीसन्मान जपणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे, आणि समाजहिताला प्राधान्य देणे. स्वराज्य ही केवळ ऐतिहासिक संकल्पना नाही; ती आजही जिवंत राहू शकते. जर प्रत्येक नागरिक जबाबदार बनला तर.

तरुण पिढीसाठी शिवाजी महाराज म्हणजे प्रेरणेचा अखंड झरा आहे. मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस, संकटात न खचता उभे राहण्याची ताकद, आणि अपयशातून शिकत पुढे जाण्याची वृत्ती त्यांनी दिली. परिस्थिती प्रतिकूल असली तरी इच्छाशक्ती आणि योग्य दिशा असेल, तर इतिहास घडवता येतो, हे त्यांनी सिद्ध केले. शिक्षण, उद्योग, शेती, विज्ञान, सामाजिक कार्य कोणतेही क्षेत्र असो, शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन मार्गदर्शक ठरू शकतो. समस्येकडे संधी म्हणून पाहणे, स्थानिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करणे, आणि लोकांना सोबत घेऊन पुढे जाणे, हे त्यांचे तत्त्व आजच्या विकासमंत्राशी सुसंगत आहे. शिवजयंती साजरी करताना ढोल-ताशांचा गजर, मिरवणुका, घोषणाबाजी यांना आपले स्थान आहे; पण त्यापलीकडे विचारांची मिरवणूक निघाली पाहिजे. प्रत्येक शाळेत, प्रत्येक घरात, प्रत्येक कार्यालयात त्यांच्या कार्यपद्धतीवर चर्चा झाली पाहिजे. मुलांना केवळ पराक्रमाच्या कथा नव्हे, तर मूल्यांची शिकवण दिली पाहिजे.

आपण स्वतःला एक प्रश्न विचारू या! स्वराज्य म्हणजे नेमके काय? केवळ सत्ता बदलणे की व्यवस्था बदलणे? शिवाजी महाराजांनी व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न केला. भीतीच्या जागी विश्वास, अन्यायाच्या जागी न्याय आणि गुलामीच्या जागी स्वाभिमान निर्माण केला. हीच स्वराज्याची खरी व्याख्या आहे. आजच्या भारताला तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि पायाभूत सुविधा यांसोबतच नैतिक नेतृत्वाचीही गरज आहे. निर्णयक्षम, पारदर्शक आणि लोककेंद्रित नेतृत्व, हेच शिवाजी महाराजांचे खरे वारसत्व आहे. ते केवळ इतिहासातील राजा नव्हते; ते विचारांचे राज्यकर्ते होते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिमान व्यक्त करू नये, तर बांधिलकी व्यक्त करावी. प्रामाणिक नागरिक होण्याची, समाजहित जपण्याची आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची. कारण स्वराज्य टिकते ते किल्ल्यांमुळे नाही, तर कर्तव्यदक्ष माणसांमुळे. छत्रपतींची जयंती म्हणजे प्रेरणेचा दीप पुन्हा प्रज्वलित करण्याची संधी. तो दीप केवळ उत्सवापुरता न ठेवता, आपल्या आचरणात तेवत ठेवला तरच त्यांना खरी मानवंदना ठरेल. आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त सर्वांना स्वराज्य, शौर्य आणि स्वाभिमानाच्या प्रेरणादायी शुभेच्छा!

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अत्यंत जवळचे स्नेही व घनिष्ठ सहकारी बळवंत हनुमंतराव वराळे यांचे आत्मकथन.... वाचनीय व प्रेरणादायी...!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वराळे :

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर एक आदर्श समाज रचनाकार होते, नवसंस्कृतीचे महानायक होते. त्यांनी समता स्वातंत्र्य बंधुताई न्याय या मानवी मूल्यांसाठी संघर्ष केला. भारतातील पददलितांना गुलामगिरीतून मुक्त केले. असा परिवर्तनाचा परिवर्तनाचे जग निर्माण करणारा शोषण विषमता नष्ट करणारा आंबेडकर हा ज्ञानाची भूक वाढविणारा, विज्ञाननिष्ठ मानवतावादाचा पुरस्कार करणारा.... बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत काम करण्याची संधी अनेकांना मिळाली. असे अनेक आंबेडकरवादी स्नेही व सहकारी बाबासाहेबांना भेटले की ते खरे आंबेडकरवादी होते त्यांना अंधश्रद्धा बाळगता आली नाही. जातीयता त्यांनी पाळली नाही. खोटे जग चितारले नाही. भूमीवरून चालताना जमिनीवर पाय घट्ट असावेत. आकाश कवेत घेता येणारा हा विचार त्यांनी आयुष्यभर सोबत ठेवला. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक नवी ऊर्जा, एक नवी शक्ती, घेऊन आपला आयुष्य घालवलं असे अनेक विचारवंत व बाबासाहेबांचे स्नेही यांनी बाबासाहेबांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. त्यापैकीच एक 'बळवंत हनुमंतराव वराळे' हे आहेत. त्यांनी 'डॉ. आंबेडकरांचा सांगाती' म्हणून आत्मकथा विनिमय प्रकाशनाने प्रकाशित केले आहे.

बळवंत वराळे हे बेळगाव मधील बेनाडी गावचे. सन १९२७ महाडच्या चवदार तळ्याचे सत्याग्रह त्यांचा सहभाग होता. मुंबई विधिमंडळात १९३७ ला स्वतंत्र मजूर पक्षातर्फे ते निवडून आले होते. सन १९४२ ला देखील त्या ऑल इंडिया शेड्युलकास्ट फेडरेशनचे धडाडीचे कार्यकर्ते होते. बाबासाहेब आंबेडकरांचे कनिष्ठ व घरोबाचे संबंध होते औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयाचे ते पहिले रजिस्टर होते. सन १९७५ ते १९७७ या दरम्यान पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे.

प्रस्तुत पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळातील चळवळील जगलेल्या कार्यकर्तुत्वाच्या अतिशय हृदयद्रावक, उद्बोधक व विचारनिष्ठ आठवणी त्यांनी कथन केल्या आहेत. स्वतंत्र मजूर पक्षाचे आमदार म्हणून ते निवडून आले होते. नंतर ऑल इंडिया शेड्युल कास्ट फेडरेशनचे अतिशय प्रामाणिक व धडाडीचे कार्यकर्ते होते.

'धुळीतून धुरंधराकडे' या पहिल्या प्रकरणात वराळे लिहीतात की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास लाभला. परिवर्तन होऊ लागले. आम्ही स्वतःला धन्य समजू लागलो. कारण धुळीतून एका महान धुरंधराचे सानिध्य मला लाभल्याने माझ्या सर्वस्वाचा कायापालट होऊन सर्वस्व पार उजळून निघाले. त्या प्रकाशाच्या लाख स्मृती मनात गर्दी करतात.

दुसऱ्या प्रकरणात 'आयुष्याचा प्रारंभ' त्यांनी रेखाटला आहे. बाबासाहेबांना पाहण्याची व ऐकण्याची संधी लाभली. दिनांक ११-१२ एप्रिल १९२५ निपाणी येथील अधिवेशन भरले. त्यात बाबासाहेब अध्यक्ष होते. निपाणीतील सामाजिक कार्यकर्ते व दलितांचे उद्धारकर्ते मारुती जोती रावण अधिवेशनात भरविण्यात पुढाकार घेतला होता. या अधिवेशनला कोल्हापूरहून छत्रपती शाहूंच्या कारकिर्दीतील ब्राह्मणेतर चळवळीचे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते बाबुराव यादव, अस्पृश्य समाजाचे गंगाराम यमाजी कांबळे, पवार, लिंगाडे, कांबळे दादासाहेब शिर्के इत्यादी मंडळींनी सहभाग घेतला होता. म्हैसूरचे समाज कल्याण मंत्री वसंतराव पाटील यांचे वडील एस. एस. पाटील अधिवेशनास हजर होते. विशेष म्हणजे या अधिवेशनाला सर्व धर्म समभाव या भावनेने सहभोजनाचा कार्यक्रम झाल्याने चैतन्य निर्माण झाले होते. अशा प्रकारचे अधिवेशनाचा कार्यक्रम अस्पृश्यांच्या वस्तीत झाला नव्हता. अस्पृश्य समाज गरीब. अनिष्ट चालीरीतीने गांजलेला, रयताकडून मागून खाणे, जोगत्या सोडणे, अशा रुढी होत्या. शिक्षण नव्हते. माणुसकीच्या भावना भारावल्या गेल्या होत्या. स्वाभिमानाची जाणीव नव्हती. महारलोक तंबाखूचे व्यापारी होते. निपाणी त्यावेळेस तंबाखू व्यापाराचे प्रमुख बाजारपेठ होती. निपाणी परिसरातील एकसंबा, सदलगा, बेडकेहाळ, बेनाडी, कोगनोळी, कोडणी, कणंगले, कोथळी, इत्यादी गावात तंबाखूचे अमाप पीक होत असे. या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन लक्षवेधी ठरले. पहिल्यांदा बाबासाहेबांच्या नेतृत्वाचा लाभ होत होता. नव्याने स्वाभिमानाची ऊर्जा निर्माण झाली होती. अस्पृश्यांचा भाग्योदय झाला होता. लोकभारवून गेले होते. अधिवेशनातील श्री रावण यांचे लक्षवेधी भाषण झाल्याची नोंद वराळे यांनी केली आहे. त्यांचे भाषण अत्यंत स्फूर्तीदायक, प्रेरक ,आणि दीर्घकाळ स्मरणात राहणारे होते असे लिहून ठेवले आहे.

तिसरा प्रकरणात आपल्या शिक्षणाविषयीच्या नोंदी केले आहेत. वडील तमाशा डफकरी होते. विठ्ठल संभाजी कांबळे चुलते शिक्षक होते. त्याला तीन रुपये पगार होता. वराळे गावातील पहिले शाळेत जाणारे महार विद्यार्थी होते. त्यांना स्पृश्य मुलासोबत बसण्याचा अधिकार नव्हता. खिडकीतून त्यांना शिक्षक जे सांगायचे ते ऐकायला व पाहायला मिळायचे. छडीने मारले तर स्पर्श व्हायचा म्हणून शिक्षक त्यांना रूळ फेकून मारत असे. त्यांना त्यांचे तीन बोट लंगोटी व त्या लंगोटी मागे वितभर सोंगा सोडलेला पोशाख असायचा. खायला कधी जोंधळ्याची भाकर तर कधी कधी अंबाड्याची भाजी असायची. एखादवेळी रयताकडून मागून आणलेले ताक किंवा कालवण हेच त्यांचे खाणे होते. अशा परिस्थितीत ते कसे आणि वाढले कसे याचे आश्चर्यकारक नोंदी करून ठेवले आहेत. त्यावेळी वराळे वडिलांच्या ट्रंकेत ठेवलेले आईचे लुगड्यासाठीचे पंधरा रुपये घेऊन मुंबईला आले. आईचे हाल झाले. जुने लुगडे देऊन बहिणीने तिची अब्रू झाकली. असे वराळे सांगतात.

चौथ्या प्रकरणात दिंडनेलीसची घटना मंदिरातील देव उलटा करून ठेवून पसार झाले. नंतर पुजाऱ्यांनी देवाचा कोप झाला. म्हणून गावात यात्रा भरण्यास सांगितल्याची मजेशीर गोष्ट त्यांनी लिहून ठेवली आहे. पाचव्या प्रकरणात सन १९२० ला शाहूंच्या प्रेरणेने बाबासाहेबांची मोठी सभा झाली बाबासाहेबांचे प्रथम दर्शन त्यांना लाभले.

महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह १९२७ चा इतिहासात गाजला. महाडच्या सत्याग्रहाची घोषणा आंबेडकरांनी महाड परिसरात अस्पृश्य समाजात एक स्वाभिमानाची लाट पसरावी यासाठी बाबासाहेब सांगतील ते करायला तिथले अनुयायी तयार झाले. प्रसंगी प्राणाची आहुती द्यायची ही देखील तयारी तिथल्या कार्यकर्त्यांनी केली होती. सन १९-२० मार्च १९२७ ला महाड भूमीवर एक नवीन नवा इतिहास घडवण्यासाठी तिथले कार्यकर्ते सज्ज झाले. महाडचा सत्याग्रह एक दोन दिवसांवर येऊन ठेपला तेव्हा सत्याग्रहाच्या तयारीसाठी सर्वजण गुंतले होते. सर्वजण बाबासाहेब यांचे मार्गदर्शन घेत होते. एकूण वातावरण घाई गडबडीचे होते. त्यावेळी त्यावेळी वराळे काही मित्रांसोबत बाबासाहेबांना भेटायला गेले त्यावेळेस बाबासाहेब त्यांना उद्देशून म्हणाले, तुम्ही विद्यार्थी आहात तुमचा अभ्यास सोडून अशा कार्यात भाग घेणे बरोबर नाही. तुम्ही तुमचा अभ्यास अगोदर नीट नीट का करा आणि मग नंतर अशा कार्यात पडणे उचित होईल. नंतर त्या सभाग सत्याग्रहात आम्हाला भाग घेता आला नाही. यामुळे वराळे निराश झाले.

वराळे यांच्या सामाजिक जीवनाला कशी सुरुवात झाली हे वराळे यांनी दोन-तीन घटना वरून नमूद केले आहे. वराळेना बाबासाहेबांनी वसतीगृह बेळगावचे बंद करून धारवाड येथे वस्तीग्रह सुरू केले होते. त्यात वराळे यांना सुपरिटेंडेन्ट म्हणून जाण्यासाठी बाबासाहेबांनी आदेश दिल. हे त्यांनी नमूद केले आहेत. नेमके याच वेळी बाबासाहेब रात्रंदिवस समाज कल्याणचा अहोरात्र विचार प्रगट करत असेल तसेच तुम्ही सर्वजण शिकून सरकारी नोकऱ्या पत्करल्यानंतर आपल्या समाजाचे काम कोण करणार मी एकटा सर्व भागात काम करू शकत नाही. तरी तुमच्यासारख्या लोकांनी आपापल्या भागात सामाजिक कार्य करावे स्वतः जबाबदारी पेलण्याची तयारी दाखवावी. असे बाबासाहेब त्या वेळच्या कार्यकर्त्यांना पुन्हा पुन्हा सांगत असत.

धारवाडच्या वसतिगृहात २९ विद्यार्थी होते त्यात महार मांग चांभार ढोर या सर्व स्पष्ट जातीची मुले होती. त्यावेळी अस्पृश्य मांडलेल्या समाजात देखील आपापसात जातीभेद पाळण्यात येत होते. परंतु धारवाडच्या वसतिगृहात या चारही अस्पृश्य जातीचे विद्यार्थी एकत्र राहत व भोजन करीत अशा प्रकारचे त्या भागातील हे पहिलेच वसतिगृह होते असे वराळे यांनी नमूद केले आहे.

वराळेंनी आठव्या प्रकरणात 'राजश्री' शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'ज्ञानर्षी'' म्हणून त्यांचा उल्लेख करून त्यांच्या कार्याची माहिती विशद केले आहे.

नवव्या प्रकरणात वराळे यांनी, 'शिका, लढा आणि संघटित व्हा' या घोषणेवर उद्बोधक लेखन केले आहे. त्यावेळी अस्पृश्य समाजात शिक्षणाची अत्यंत गरज आहे असे बाबासाहेबांना पुन्हा पुन्हा वाटू लागले म्हणून त्यांनी १९२४ साली मुंबईस बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन करून अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय व्हावी यासाठी म्हणून ठिकठिकाणी मोफत वस्तीग्रह स्थापन केले. सामाजिक दृष्टीने अत्यंत खालच्या स्तरावर आलेल्या अस्पृश्यजवळ समाजातील लोकांच्या मनात स्वाभिमान उत्पन्न केला. आपणही माणसे आहोत. माणसाप्रमाणे जगण्याचा आपणास या हक्क आहे. आपण इतरांपेक्षा कोणत्याही प्रकारे कमी नाही. अशा प्रकारची जाणीव करून द्यायला त्यांनी सुरुवात केली होती. बहिष्कृत हितकारणी सभेचे घोषवाक्य 'एर्वीलरींश, सळींरींश रपव जीसरप-ळीश' असे होते. या घोषणांनी बाबासाहेबांनी समाजात जागृती निर्माण केली. अस्पृश्य समाजात त्यावेळी अनेक वाईट चालीरीती होत्या. मृत मांस खाणे, मुरळ्या सोडणे, जोगत्या सोडणे, देवदासी सोडणे, देव देवतांना जनावरे बळी देणे, गावात भाकरी मागून खाणे, अशा प्रकारच्या रूढीवर आधारलेल्या चालीरीती होत्या या नाहीशा करण्यासाठी बाबासाहेबांनी या चळवळीद्वारे प्रयत्न सुरू केले. यासाठी ठीक ठिकाणी सभा संमेलने भरवत असत. स्वतः त्यांनी दौरे काढत. माणुसकीला भुकेलेल्या अस्पृश्य समाजातून बाबासाहेबांच्या बाबासाहेबांना मोठ्या प्रमाणात साथ मिळत होती. लोक पेटून उठत. अस्पृश्य समाज एकदम जागा झाला. आपल्या हक्कासाठी माणुसकीसाठी वाटेल तो त्या करण्याची हमी समाजाने बाबासाहेबांना दिली. कारण बाबासाहेबाच आपल्या समाजाचा उद्धार करतील अशी त्यांची खात्री पक्की झाली होती. बाबासाहेबांनी ज्यावेळी चळवळ सुरू केली त्यावेळी अस्पृश्य समाजात देखील चातुर्वण्याला अनुसरून उच्च -कनिष्ठ, भाव जातीभेद आपसात मानले जात होते. यावर देखील बाबासाहेबांनी कडाडून हल्ले केले. वाईट चालीरीती मोडण्याच्या बाबतीत त्यांनी समाजाला तयार केले.

वराळे यांनी १९२९ ला बाबासाहेबांच्या आदेशानुसार धारवाडला बोर्डिंग सुरू करण्यात आले. वस्तीगृहाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली होती. सुरुवातीला वस्तीग्रहाची आर्थिक स्थिती म्हणावी तशी चांगली नव्हती. सन १९३२ डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड व डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्डाचा मेंबर म्हणून वराळे यांची निवड झाली यावेळी वस्तीग्रहाच्या मदतीसाठी वर्गणी जमा करण्यासाठी वराळे यांना बाहेरगावी जावे लागत असे. असे धारवाड्यातील कार्याच्या नोंदी प्रकट केले आहेत.

सन १९३१ ला मे महिन्यात बाबासाहेब आंबेडकर त्यावेळी गोलमेज परिषदेला गेले होते. त्याच दरम्यान मातोश्री रमाबाई आंबेडकर या निपाणी राहायला आल्या होत्या त्यांच्या समवेत त्यांची जाऊ लक्ष्मीबाई मुलगा यशवंत पुतण्या मुकुंद व नात द्रोपती ही सर्व मंडळी आली होती दलित समाजाचे हितचिंतक मारुती ज्योतिराव रामन हे त्यावेळी मुळशी पार्टीचे चेअरमन होते त्यांनीच पुढाकार घेऊन रमाबाई यांची राहण्याची उत्तम व्यवस्था केली होती तेथे आई मायेचा रमाई एक दिवस राहिल्या व माझी भराळे यांची पत्नी राधाबाई या आई सोबतच्या सानिध्यात होत्या. वराळे यांची पत्नी रमाई ना काय हवे काय नको ते सर्व काळजीपूर्वक पाहत होत्या दुसऱ्या दिवशी रमाईने वराळे यांची घर पाण्याची इच्छा व्यक्त केली व तिथे त्यांच्या झोपडीत पाहिल्यानंतर आम्ही झोपडीतच राहू आम्हाला इथे राहायला आवडेल अशी इच्छा व्यक्त केली. ज्यावेळेस रमाई वराळे यांच्या दहा बाय बाराच्या कट्ट्याचे छप्पर असलेल्या घरात राहायला गेला त्यावेळी रमाई व तिचे मुकुंद यशवंत असे तिघेजण मुक्कामास होते रमाई व सर्व मंडळी व वराळे यांच्या पत्नी त्यांची आई गिरजाबाई हे सर्वजण झोपडीत झोपत असे रमाईच्या वास्तव्यामुळे त्यांच्या झोपडीला एक मोठे पवित्र निर्माण झाले होते त्यावेळी आजूबाजूच्या खेड्यातील असंख्य लोकांची रिंग आमच्या घरात वराळे यांच्या घराकडे रमाईचे दर्शन घेण्यासाठी येत होते त्यांच्या झोपडीला एक प्रकारचे तीर्थस्थान प्राप्त झाल्याचे वराळे यांनी नमूद केले आहे. रमाई आंबेडकर अत्यंत साध्या प्रेमळ राहणीमान असलेल्या व अहंकाराचा लवलेशी नसलेला अशा स्वाभाविक स्वभावाच्या असल्याचे त्यांना क्षणाक्षणाला प्रत्यय येतो असे वराळे यांनी लिहून ठेवले आहे घरात जे असेल त्याचा त्या आनंदाने स्वीकार करीत व आनंदाने त्याच दररोज जेवायला वाढत होत्या साधारणता पंधरा दिवस त्यांनी पाणी राहण्यासाठी होत्या असे वराडे यांनी या आत्मकथेत नोंद केली आहे.

तज्ञांचे तदनंतरच्या प्रकरणात वराळे यांनी रमाई आंबेडकर व बाबासाहेब आंबेडकर यांची बोटीवरील भेट, गोलमेज परिषदेनंतर बाबासाहेबांचे भव्य स्वागत, बाबासाहेबांचा आजार, बाबासाहेबांचा पन्हाळ्यावरील मुक्काम, कोल्हापूर येथील दलित वर्गाची परिषद; बाबासाहेबांना संकेश्वरास जाताना झालेला अपघात; हुबळीची सभा; बाबासाहेबांची सावंतवाडी निपाणीची सभा; कामठी परिषद, नाशिक सत्याग्रह, महार परिषद, कार्लाच्या लेणी आणि भोजन, स्वतंत्र मजूर पक्ष स्थापना व विधान सभेत प्रवेश; मिरजेचा सत्याग्रह, रिक्रुटिंग ऑफिसर; टॉबी आणि पाडस; किल्ले पन्हाळगड; निपाणीची १९३८ ची सभा; व बेळगावची सभा आणि वराळेंचा अपघात; पुणे करार; नाशिक येथील शे.का.फे ची सभा; वराळे लेबर ऑफिसर व पदाचा राजीनामा; १९४६ ची निवडणूक दौरा; तंबाखूचा व्यापार; आदी प्रकरणे आंबेडकरांचे सांगाती म्हणून वराळेंनी खुबीने रेखाटले आहे. ....!

– डॉ. दत्तात्रय गायकवाड.
मो. ९८६०५९१३०५

**पुस्तकाचे नाव :** डॉ. आंबेडकरांचा सांगाती
**लेखक. :** बळवंत हनुमंतराव वराळे,
**प्रकाशक :** विनिमय पब्लिकेशन, विक्रोळी मुंबई,
**प्रकाशन वर्ष :** दुसरी आवृत्ती; डिसेंबर २०२२
**एकूण पृष्ठे. :** ३३६
**किंमत :** रू. ३५०
**प्रकाशकाचा फोन :**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# छत्रपती शिवरायांचे प्रजेच्या कल्याणासाठीचे लौकिक कार्य

## डॉ प्रकाश पांढरमिसे; बार्टीत शिवजयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज यांनी आठरापगड जातीतील व धर्मातील मावळ्यांना सोबत घेऊन स्वराज्य उभारले. त्यांनी सर्व जाती -धर्माचा सन्मान केला. शिवरायांनी पोटाच्या लेकराप्रमाणे रयतेची काळजी घेतली.

त्यांनी प्रजेच्या कल्याणासाठी लौकिक काम केले. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाद्वारे या देशातील जनतेला संविधानिक न्याय मिळवून दिला. शिवराय आणि भीमराय यांनी प्रजेच्या कल्याणासाठी दूरदृष्टी ठेवून कार्य केले असून त्यांचा सामाजिक समतेचा वारसा आपण पुढे नेला पाहिजे,असे प्रतिपादन इतिहास संशोधक डॉ प्रकाश पांढरमिसे यांनी बार्टी संस्थेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती कार्यक्रमात प्रमुख व्यक्ते म्हणून बोलताना व्यक्त केले.

बार्टी मुख्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख रविंद्र कदम हे होते. या वेळी विभागप्रमुख श्रीमती शुभांगी पाटील, डॉ बबन जोगदंड, प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, डॉ सारिका थोरात, महेश गवई, आरती जाधव, शुभांगी सुतार, आदी बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रस्ताविक करताना विस्तार व सेवा विभागाचे विभाग प्रमुख डॉ बबन जोगदंड यांनी केले.

यावेळी पुढे बोलताना पांढरमिसे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेचे राज्य आणले. त्यांच्या कार्याला उजाळा देऊन आपण त्यांचे विचार आचरणात आणले पाहिजे तसेच आपण समाजाचं काही देणे लागतो या भावनेतून काम केले पाहिजे.

महापुरुषांनी मानवी कल्याणासाठी आपले जीवन समर्पित केले. आपणही आपल्या आचरणातून समाजाप्रती योगदान द्यावे, असे आवाहानही त्यांनी यावेळी केले. बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

सूत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले. प्रारंभी अमीर मुलानी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर गीत सादर केले.या कार्यक्रमाला बार्टीमधील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई; वाळू वाहतूक करणारा टेम्पो मुद्देमाल जप्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आंबे गावातील भीमा नदी पात्रालगत असलेल्या ठिकाणी अवैधरित्या टेम्पो क्रमांक एम एच ४५ ९० ९७ या टेम्पोमध्ये टेम्पो चालक गोपाळ प्रचंडे राहणार आंबेगाव हा आपल्या ताब्यात अवैधरित्या महाराष्ट्र शासनाची मालकीची भीमा नदी पत्रातील वाळू सदर टेम्पोमध्ये चोरून घेऊन जात हसण्याचा त्या ताब्यात घेऊन पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन ने सदर आरोपी गोपाळ प्रचंडे राहणार आंबेगाव हा आपल्या ताब्यात अवैधरित्या महाराष्ट्र शासनाची मालकीची भीमा नदी पाथर्डी वाळू सदर टेम्पोमध्ये चोरून घेऊन जात असताना त्याच ताब्यात घेऊन पंढरपूर तालुका पोलिसांनी आरोप प्रचंड राहणार आंबेगाव महिंद्रा टेम्पो मालक यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५/३०३ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून सदर आरोपीकडून एक ब्रास वाळू महिंद्रा कंपनीचा टेम्पो असा एकूण पाच लाख सहा हजार रुपये किमतीचा मध्यमान पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून ताब्यात घेतलेला आहे सदर आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक साहेब श्री आतुर कुलकर्णी माननीय अप्पर पोलीस अधीक्षक साहेब श्री प्रीतम यावलकर माननीय उपविभागीय पोलिस अधिकारी श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे पोलीस हेडकॉन्स्टेबल मंगेश रोकडे पोलीस हेडकॉन्स्टेबल्यू गरड, पोलीस कॉन्स्टेबल संजय गुटाळ, सागर माळी, विजयकुमार आवटी, पोलीस चालक चाटे विलास घाडगे, हसन नदाफ यांच्या पथकाने केली आहे.

## मानवाने सुखी आणि समाधानाने जीवन जगण्यासाठी तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी सांगितलेल्या पंचशील तत्त्वाचे पालन करणे गरजेचे आहे : अरुण लोखंड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी जगातील संबंध मानव जातीसाठी मानवतेची शिकवण देणारा बौद्ध धम्म दिला असून मानवाने सुखी आणि समाधानाने जीवन जगण्यासाठी तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी सांगितलेल्या पंचशील तत्वाचे पालन करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे तुळजापूर तालुका अध्यक्ष तथा पत्रकार अरुण लोखंडे यांनी नंदगाव तालुका तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.



या बाबत सविस्तर असे की, भारतीय दलित पँथर चे धाराशिव जिल्हा संपर्क प्रमुख रिपब्लिकन चळवळीथील कार्यकर्ते पत्रकार शामकांत बळीराम नागिले यांच्या बौध्द नगर नंदगाव येथील रमाई निवासस्थानी बौद्धांचे श्रद्धास्थान असलेल्या बुद्धगया येथून आणलेल्या बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी अरुण लोखंडे बोलत होते , पुढे बोलताना ते म्हणाले की सध्या सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी बौद्ध तत्त्वज्ञानाच्या विचारांची गरज असून बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणे बरोबरच तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी सांगितलेल्या विचाराचे पदोपदी आचरण करणे महत्त्वाचे आहे.

प्रारंभी नंदगावचे सरपंच शशिकांत नागीले व शामकांत नागिले आणि त्यांच्या सहचारणी यांच्या शुभहस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध मुर्तीची आणि भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिकरित्या बुद्ध वंदना घेऊन बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी एस के गायकवाड व सदानंद कांबळे अचलेर यांनी धम्म संस्कार विधी पार पाडला. या प्रसंगी नळदुर्ग नगर परिषदेचे नगरसेवक तथा गटनेते मारुती खारवे, सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे डी.बी.एन.संस्थेचे तालुका अध्यक्ष उमेश गायकवाड अरविंद लोखंडे, ज्येष्ठ कार्यकर्ते रामलिंग गायकवाड, बुद्ध मूर्तीदाता सतीश सुरवसे, विजय कांबळे, सचिन कोरे, सतीश काटे, सूरज गुड्डे, सागर चौगुले, दिगंबर वाघमारे,अमित लोंढे, अरविन्द दबडे, नंदकुमार गायकवाड, यमाजी लोखंडे, राजू माने, विजय गायकवाड,विठ्ठल घोडके, युवराज जेठीथोर,वालचंद कांबळे, मा.जिल्हा परिषद सदस्या रेखा गायकवाड, भिवा गायकवाड आदि उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन रिपाइं(आठवले) पक्षाचे धाराशिव जिल्हा सचिव एस.के.गायकवाड यांनी केले, तर आभार शाम नागिले यांनी मानले.

## टाकळीवाडी येथे शिवजयंती उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे छत्रपती शिवाजी चौक येथे छत्रपती शिवजयंती निमित्त पन्हाळगडावरून ज्योत आणण्यात आली. मूर्ती पूजन , मर्दानी खेळ , व महाप्रसादाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

संध्याकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली. समस्त नागरिकांच्या वतीने नुकताच पंचायत समिती शिरोळ सदस्य पदी निवड झालेले बाबासाहेब वनकोरे, अविनाश पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गावचे सरपंच मंगल बिरणगे यांचा देखील सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला मोलाचे योगदान रामचंद्र बेडक्याळे, छत्रपती ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष प्रमोददादा पाटील, समस्त सकल मराठा समाज, नागरिक, यांचे मोलाचे योगदान लाभले.

## अमर मराठी विद्यालय व गोकुळ बालक मंदिर ३९६ वी शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



न्यु महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचलीत अमर मराठी विद्यालय व गोकुळ बालक मंदिर शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.रचना हंचाटे मॅडम तसेच गोकुळ बालक मंदिरच्या शिक्षिका सौ.ज्योती चौगुले व सौ.सुनंदा बुर्ला मॅडम यांनी पाळणा गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर शाळेतील बालचिमुकल्यांनी शिवरायांच्या आयुष्यातील जिजाऊंची शिकवण, स्वराज्याची प्रतिज्ञा,दांडपट्टा तलवारबाजी,गडावर चढण्याचे प्रसंग, शिवरायांना भवानी मातीने दिलेली तलवार असे अनेक प्रसंग आपल्या नाट्यीकरण्यातून उपस्थित वर्गाला करून दिली. शिवरायांचे राज्याभिषेकाच्या वेळीच्या प्रसंगी शिवरायांच्या वेशात चि.दिनेश झिपरे तसेच माता जिजाऊंच्या वेशात कु.शिवन्या चौगुले तसेच देवीच्या रूपात कु. श्रद्धा कटारे यांचे नाट्यीकरण पाहून सर्वजणच भावुक झाले. आपल्या या नाट्यीकरणातून उपस्थित सर्वांचे मने जिंकले व शिवरायांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला,अशा प्रकारे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रचना हंचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली व सौ. सुनंदा बुर्ला व सौ.ज्योती चौगुले यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### एकदिवसीय चर्चा सत्रातील सूर

## पियर एज्युकेटर हा केवळ माहिती देणारा नसून परिवर्तन घडविणारा मार्गदर्शक ठरतो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (दि. १९) प्रिसिजन फाउंडेशन सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व इंडियन रेडक्रॉस सोसायटी, शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पियर एज्युकेटर व कम्युनिटी मोबिलायझर यांच्या करीता एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन श्रीमती गोपाबाई रक्त संकलन केंद्र सोलापूर येथे करण्यात आले.

या चर्चासत्रात सोलापूर शहर व जिल्ह्यातील एकूण २५ शाळेतील ६० विद्यार्थी व ३० शिक्षक तर १० सामाजिक संस्थांचे २० प्रतिनिधीं सहभागी झाले होते. सुरुवातीला प्रिसिजन फौंडेशनच्या सहाय्यक जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

यावेळी व्यासपीठावर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा.डॉ. एन.बी. तेली, माजी अध्यक्षा प्रा. डॉ. नभा काकडे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, ललित दंडी, विठ्ठल चव्हाण आदी उपस्थित होते.




चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी युवकांची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका विषद केली व म्हणाले की, प्रत्येक शाळा व महाविद्यालयात सी.पी. आर. व फर्स्ट एड चे प्रात्यक्षिक दाखविल्यास युवा वर्गाची प्रशिक्षित फळी तयार होईल व अनेकांचे जीव वाचू शकतील. आपत्ती व्यवस्थापनात काम केलेले प्रशांत शेन्डे व बजरंग होटकर यांनी पुरात अडकलेल्या लोकांचे बचाव कार्य सांगितले.

डॉ. नभा काकडे यांनी पियर एज्युकेटरची जबाबदारी व योगदान या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण हे किशोरवयीन मुलामुलींना शारीरिक, भावनिक, सामाजिक व लैंगिक आरोग्याबाबत योग्य, वैज्ञानिक व मूल्याधिष्ठित माहिती देणारे शिक्षण आहे. या प्रक्रियेत पियर एज्युकेटर अर्थात समवयस्क मार्गदर्शक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो.

चर्चासत्राच्या दुसऱ्या सत्रात किशोरावस्था व आव्हाने या विषयावर बोलताना डॉ. गौरी कहाते म्हणाल्या की, किशोर अवस्थेत पदार्पण करताना मुलांमध्ये व मुलींमध्ये शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सामाजिक बदल झपाट्याने होतात. या काळात त्यांना स्वतःची ओळख निर्माण करण्याचे आव्हान, समवयस्कांचा दबाव, भावनिक ताण येत असतो त्यावर योग्य मार्गदर्शन हाच एकमेव उपाय आहे. तर शेवटी वीरेंद्र परदेशी यांनी पियर एज्युकेटरची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रम अंती शिक्षक मनोगत घेण्यात आले त्यात सर्वंकश लैगिंक शिक्षण ही आजच्या काळाची गरज आहे पण हा विषय शाळास्तरावर शिकवण्यासाठी आम्हला खूप आव्हाने येतात पण फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या माध्यमातून हा सहज विद्यार्थी शिक्षक यांच्या पर्यत पोहोचला.आमची चिंता या संस्थेने कमी केली याबाबत त्यांनी मनापासून आभार मानले.

स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार सत्यभामा कांबळे यांनी मानले. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी उर्मिला बनसोडे, विकी शिवशरण, संध्या वाघमारे, आकाश गायकवाड, कल्पना बनसोडे आदींनी परिश्रम घेतले.

## छत्रपती शिवरायांच्या मार्गावर चालणे हाच विकासाचा खरा मार्ग : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून...)

तर ते त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे प्रेरणास्थळही होते. पवित्र शिवनेरी किल्ल्याविषयी केवळ जिव्हाळाच नव्हता, तर या शिवजन्मभूमीचे सौंदर्य वाढावे, तिचा ऐतिहासिक वारसा जपला जावा आणि भावी पिढ्यांना अभिमानाने दाखवता यावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारातून 'किल्ले शिवनेरी विकास आराखडा' साकार झाला आणि या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला.

गेल्या वर्षी युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत किल्ले शिवनेरीचा समावेश झाला आहे. त्यापूर्वीच शिवजन्मभूमी शिवनेरीसह राज्यातील गडकोटांच्या जतन-संवर्धनासाठी त्यांनी निधीची तरतूद केली होती. केवळ शिवनेरी किल्ल्यापुरते मर्यादित न राहता, शिवजन्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जुन्नर तालुक्याला पर्यटन तालुका म्हणून विकसित करण्याचा संकल्प त्यांनी ध्यासाने घेतला होता आणि त्या दिशेने ठोस पावले उचलली होती.

गेल्या अर्थसंकल्पात आग्रा येथे महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे शिवस्मारक उभारण्याचा निर्धार, पानिपत येथे मराठा शौर्य स्मारक तसेच संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचा समावेश आहे, असा संकल्प करण्यात आला होता.

किल्ले रायगड विकास आराखडा व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ तुळापूर आणि समाधी स्थळ वढू बुद्रुक येथे स्मारकाचे काम अत्यंत वेगाने सुरु असून ही सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. या प्रत्येक स्मारकातून भावी पिढ्यांना प्रेरणा, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश मिळत राहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील प्रत्येक घटकाची काळजी घेण्याची शिकवण आपल्याला दिली असून त्याच विचारांवर आणि रयतेचं राज्य' या संकल्पनेवर राज्य सरकार पुढे वाटचाल करीत आहे. शिवछत्रपतींच्या स्वप्नातील सुजलाम सुफलाम, न्याय आणि समृद्ध स्वराज्य घडवण्यासोबतच यापुढेही महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध राहील, असा विश्वास उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी व्यक्त केला.

आमदार सोनवणे यांनीही आपले विचार व्यक्त केले.

प्रारंभी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायिला. राष्ट्रगीत तसेच 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताची धून पोलीस बँड पथकाने वाजवून सलामी दिली. त्यानंतर पोलीस पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. यावेळी जिल्हा परिषद शाळच्या लहान विद्यार्थ्यांच्या पथकाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग सुंदर पद्धतीने सादर केले.

त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बाल शिवाजी व माँसाहेब जिजाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पालखी वाहीली.

यावेळी मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रगत प्रगतशील शेतकरी स्व. पंकज वामन, खारघर येथील टाटा कॅन्सर रुग्णालयाचे विभाग प्रमुख डॉ. विनोद सीतराम हांडे, लेफ्टनंट अजिंक्य मेहेर, माजी पंचायत समिती सभापती शिवाजीराव खैरे आणि उपलेफ्टनंट श्रुतिका ताथवडे यांना शिवनेर भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, मराठा सेवा संघाचे पदाधिकारी यांच्यासह शिवभक्त उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# टाळ-मृदंगाच्या गजरात शिवजयंती उत्साहात





## मेरा बुद्रुक येथे डीजेला बाजूला सारत,टाळ मृदंगाच्या तालावर शिवभक्तांनी धरला ठेका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे / चिखली तालुका प्रतिनिधी

चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अति उत्साहात साजरी करण्यात आली,विशेष म्हणजे या मिरवणुकीमध्ये आयोजकांनी छत्रपती शिवाजी महाराज उत्सव समितीच्या वतीने डीजेला फाटा देत,डीजेचा कुठलाही कर्कश आवाजमुक्त साध्या पद्धतीने भक्ती भावामध्ये टाळ मृदंगाच्या गजरामध्ये राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना अनोखे अभिवादन केले.

दिनांक १९ फेब्रुवारी २०२६रोजी सकाळी साडेसात वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला शिवभक्त व गावकऱ्यांच्या वतीने दुग्धाभिषेक करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेसह सर्वच महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर गावातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पालखी,सजविलेल्या ट्रॅक्टरवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेसह गावातून शोभायात्रा निघाली.महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून शोभायात्रा गावातून निघाली.

ह.भ.प दत्ता महाराज गायनाचार्य, ह.भ.प. सतीश महाराज, ह.भ.प. राम महाराज मृदंगाचार्य तसेच जागदरी येथील वारकरी संप्रदायाची टाळकरी प्रशिक्षणार्थी मुले यांनी टाळ मृदुंगाच्या तालावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयघोष केला. शोभायात्रा अतीमशाहवली बाबांच्या दर्ग्यासमोर आली असता मुस्लिम बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीवर पुष्पवृष्टी तसेच हार अर्पण करून एकतेचा संदेश दिला.शोभा यात्रेमध्ये गावकऱ्यासह सर्व जाती धर्मातील लोकांनी सहभाग घेतला होता.शोभायात्रा सकाळीच टाळकरी वारकरी यांच्या टाळ मृदुंगाच्या गजरामध्ये निघल्यामुळे भक्तिमय वातावरण रंगत भरली होती.

### मुस्लिम बांधवांनी शिवजयंती मिरवणूकीवर पुष्पवर्षाव करून दिला एकतेचा संदेश

शोभायात्रे दरम्यान गावातून ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. विशेष म्हणजे शोभा यात्रेमध्ये महीलांचा मोठा उस्फुर्त सहभाग होता. संपूर्ण गावातून भक्तिमय वातावरणात शोभायात्रा निघून समारोप छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ झाला. समारोपा प्रसंगी काही मान्यवरांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनपटावर समायोजित भाषणे झाली. यावेळी, ह.भ.प.महाराज,टाळकरी भजनी मंडळ, अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदारासह कर्मचारी, यांना छत्रपती शिवाजी महाराज उत्सव समिती यांच्यातर्फे श्री फळांचे वाटप करण्यात आले.

शोभा यात्रेमध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून अंढेरा पोलीस स्टेशनचे मा.ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्यासह कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी शोभायात्रेमध्ये सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष यांच्यासह बालगोपाल, महिला, पुरुष तसेच सर्वच जाती धर्मातील लोकांनी सहभाग घेतला. राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची यावर्षी वेगळ्या पद्धतीने आदर्श जयंती साजरी करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीने परिश्रम घेतले.

# निफाड 'वैनतैय'च्या चिमुकल्यांनी साकारले शिवरायांचे गड-किल्ले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

महाराष्ट्राला गड किल्लयांचा मोठा वारसा लाभलेला आहे. शिवजयंती निमित्ताने अवघे वातावरण भगवेमय होत आहे.निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक वारसा जपत विविध गड-किल्लयांच्या प्रतिकृती साकारल्या.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या गड-किल्लयांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन न्या. रानडे विद्याप्रसारक संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, विश्वस्थ मधुकर राऊत, ड. दिलीप वाघावकर, मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे आदि मान्यवरांच्या हस्ते झाले. शिक्षक गोरख सानप यांच्या मार्गदर्शना खाली द्राक्षांचे तसेच ड्रेसचे रिकामे खोके, जुन्या वह्यांचे पुठ्ठे या टाकाऊवस्तूंचा वापर करून गड-किल्ले तयार करण्याच्या कार्यशाळेत १३३ प्रतिकृती तयार करण्यात आल्या, यासह सानप यांनी चौथीच्या अभ्यासक्रमावर आधारीत साकारलेल्या द्विमिती चित्र प्रकारातील शिवसृष्टीचे वैनतेय प्राथमिक, माध्यमिक,व इंग्रजी माध्यमेतील विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी लाभ घेतला. जलदुर्ग, गिरीदुर्ग, भुईदुर्ग यांसह किल्यांच्या माहितीचे सादरीकरण याप्रसंगी विद्यार्थ्यांनी केले.

### शिवरायांच्या स्मृती जपण्याचा प्रेरणादायी उपक्रम

शिवरायांचा जन्म, त्यांचे बालपण, शिक्षण, स्वराज्याचे तोरण, प्रतापगडावरील पराक्रम, घोडखिंडीतील पराक्रम, शायिस्तेखानाची फजिती, आग्र्याहून सुटका, राज्याभिषेक यांसारख्या विविध चित्र प्रसंगातून विद्यार्थ्यांना स्फूर्ती व प्रेरणा मिळाली. या प्रदर्शनास जि.प. निफाड शाळेचे मुख्याध्यापक निलेश शिंदे, महाजन, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त विजेते शिक्षक सुरेश धारराव, विजय शिंदे, कुमार जंगम, यासह अनेक शिक्षकांनी भेट दिली

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा वारसा प्रत्यक्ष कृतीतून रूजविण्यासाठी राबविलेल्या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त राजेद्र राठी, किरण कापसे,राजेश सोनी, ड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, नरेंद्र नांदे, प्रभाकर कुयटे, निफाडचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी विस्तार अधिकारी लता भरसट, कैलास बोरसे, वसंत गायकवाड, केंद्रप्रमुख अनिता अहिरे, शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे व पालकांनी कौतुक केले.



### विद्यार्थ्यांनी जपला ऐतिहासिक वारसा

गड-किल्ले केवळ पर्यटन स्थळे नसून ती महाराष्ट्राच्या इतिहासाची जिवंत स्मारके आहेत. प्रत्यक्ष कृतीतून ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी चिमुकल्यांनी राबविलेला उपक्रम कौतुकास्पद आहे, असे अध्यक्ष, न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाड वि. दा. व्यवहारे यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शिकतांना त्यांचे किल्ले तयार करतांना किल्लयांचे प्रकार, बालेकिल्ला, बुरूज, तटबंदी, राजवाडा, नगारखाना,माची, महादरवाजा यांसारख्या गोष्टीची माहिती मिळाली. स्वतः किल्ला तयार करताना आम्हा मुलांना खूप आनंद आला, असे विद्यार्थिनी वेदिका गारे वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर , निफाड हिने सांगितले.

# जिल्हा परिषद निवडणूकीत नेत्याला गुलाल लागल्याशिवाय पायात चप्पल न घालणारा नंदगावचा अवलिया संजय पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/एस. के. गायकवाड : नुकतेच पार पडलेल्या धाराशिव जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळी मध्ये प्रत्येक पक्षातील कार्यकर्ते आपापल्या परीने आपल्या नेताला कशा पद्धतीने निवडून आणता येईल यासाठी पराकाष्ठा करून मेहनत करत होते.प्रत्येक कार्यकर्ता हा आपलाच नेता विजयी झाला पाहिजे हि भावना मनात ठेवून प्रचारार्थ उतरला होता.

अनेकांनी सोशल मीडियावर विजयी भव फिक्स निवडून येणार.. आम्हीच गुलाल उधळणार.. अशा अनेक पोस्ट रिल अपलोड करत हैदोस घातलेल आपण पाहिलं.नेत्यांसाठी कुणी पैज लावत होतं कुणी नवस पण करत होतं.अनेकांनी अनेक दावे करत अपापल्या नेत्यांवरची निष्ठा दाखवली.असाच काहि घडलं ते तुळजापूर तालुक्यातील नंदगाव जिल्हा परिषद गटात येथील महायुतीचे उमेदवार सिध्देश्वर कोरे निवडणूकीत विजयी होऊन गुलाल लागल्याशिवाय पायात चप्पल न घालण्याचा पण केलेला अवलिया पाहावयास मिळाला. कोरे यांचे निष्ठावंत कार्यकर्ते संजय पाटील हे निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून ते निकाल लागेपर्यंत गुलाल लागल्याशिवाय पायात चप्पल घालणार नाही.असा निर्धार पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर दर्शन घेऊन केलो होता.

त्यांनी निवडणूकीत संपूर्ण प्रचार चप्पल न घालता अनवाणी पायाने फिरत तब्बल २५ दिवस जिल्हा परिषद गट पिंजून काढला.कार्यकर्त्यांचा पाठबळवर आणि जनमतामुळे कोरे यांना घवघवीत यश मिळाले.आणि कार्यकर्त्याला स्वतः हाताने चप्पल पायात घालले. नेत्यावर निष्ठा दाखवणाऱ्या या अवलियाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गौरवोद्गार**

**लाल किल्ल्यात शिवजन्मोत्सवाचा सोहळा उत्साहात**

# शिवनेरी प्रेरणेची तर आग्र्याचा लाल किल्ला ही स्वाभिमानाची भूमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आग्रा : छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती ही देशाला एक तेजस्वी प्रेरणादायी इतिहासाचे पुन्हा स्मरण करण्याची संधी आहे. शिवरायांची जन्मभूमी असलेला शिवनेरी किल्ला प्रेरणेची तर आग्र्याचा लाल किल्ला ही स्वाभिमानाची भूमी आहे. आग्रा येथे ज्या ठिकाणी महाराजांना कैद केले होते तेथे पुढील वर्षी स्मारकाचे काम सुरु झालेले असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

शिवजयंतीनिमित्ताने आग्रा येथील ऐतिहासिक लाल किल्ला येथे अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानतर्फे आयोजित 'शिवजन्मोत्सव भारतवर्ष का' या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील, उत्तर प्रदेशचे उच्च शिक्षण मंत्री योगेंद्र उपाध्याय, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, आमदार प्रशांत बंब, मीना बाजार ट्रस्टचे अनिल गुप्ता, कार्यक्रमाचे आयोजक व प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या अनोख्या महोत्सवाच्या आयोजनाचे हे चौथे वर्ष आहे.

आग्रा येथील लाल किल्ल्यात शिवजयंती साजरी करण्याची परंपरा ही वैशिष्ट्यपूर्ण असून यापुढे ती निष्ठेने जपली जाईल असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, आग्रा येथील शिवाजी महाराजांना कैद केलेल्या जागेवर स्मारक उभारण्याचा संकल्प गेल्या जयंतीदिनी आम्ही सोडला होता. हे स्मारक उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाने समिती गठित केली. उत्तर प्रदेश सरकारनेही जमीन अधिग्रहणासंदर्भात मंत्रिमंडळात निर्णय घेत सहकार्य केले असून या स्मारकाच्या निर्मितीला लवकरच गती मिळेल. तसेच पुढच्या वर्षापासून या जागेवरही जयंती साजरी केली जाईल. शिवरायांचा इतिहास महाराष्ट्रात शिकवला जातो तो आता देशभरात शिकवला जावा या जनभावनेच्या आदर करून नव्या सीबीएसईच्या पुस्तकात आता शिवरायांच्या इतिहासाला २० पाने दिली आहेत. यापूर्वी केवळ एका परिच्छेदात हा इतिहास सांगण्यात आला होता. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने हा इतिहास आता सर्वत्र पोहोचत असल्याबाबत मुख्यमंत्र्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

छत्रपती शिवरायांच्या ४०० व्या जन्मशताब्दी वर्षी म्हणजे २०३० मध्ये आग्रा येथील याच लाल किल्लयात पंतप्रधान मोदींसह आम्ही हा उत्सव साजरा करु, असे आत्मविश्वासाने सांगून मुख्यमंत्री म्हणाले, अनेक योद्धे देशात झाले पण शिवराय अद्वितीय होते. बलाढ्य मुघलांशी अनेकांनी समझोता केला मात्र, अशा काळातही शिवरायांना रयतेचे राज्य स्थापन करण्याची प्रेरणा माँसाहेब जिजाऊंनी दिली. त्यानंतर शिवरायांनी प्रतिज्ञा घेऊन यासाठी स्वराज्यनिर्मितीचा ध्यास घेतला. अठरापगड जातींना सोबत घेऊन महाराजांनी स्वराज्य, स्वभाषा आणि स्वाभिमानाच्या लढाईची शिकवण दिली. महाराजांनी रूढ केलेला गनिमी कावा जगभरात स्वीकारला गेला. महाराजांनी केवळ राज्य स्थापन केले नाही तर एक विचार दिला. त्यामुळे मुघलांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही हिंदवी स्वराज्य नष्ट झाले नाही. उलट हे साम्राज्य नष्ट करण्यासाठी महाराष्ट्रात आलेल्या औरंगजेबाची कबरच इथे खोदली गेली. पुढील काळात तर मराठी साम्राज्य कटकपासून अटकपर्यंत पोहोचले. मुघलांनंतर थेट इंग्रज राज्य स्थापन झालेले नाही. त्यामधल्या काळात मराठ्यांचा उज्वल इतिहास निर्माण झाला आहे. मात्र, तो दुर्लक्षित केला गेला होता. या गौरवशाली इतिहासाला आम्ही पुन्हा उजाळा देत आहोत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीती आणि न्यायदानाचा गौरव करत महाराजांनी जगाला दिलेली गनिमी काव्याची युद्धपद्धती आजही तितकीच प्रभावी असल्याचे सांगितले. ते म्हणाले, महाराजांनी सुरत लुटली हा गैरसमज दूर करण्याची गरज आहे; उलट तिथल्या व्यापाऱ्यांनी मुघल सत्तेच्या जाचातून मुक्त होण्यासाठी महाराजांना पाचारण केले होते, याचे दाखले आहेत. ज्यावेळेस सुरतमध्ये शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण झाले त्यावेळेस लाखोंचा जनसागर उपस्थित होता. त्यानंतर तत्कालिन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने गुजरातमधील नवसारी, सोनगड, व्यारा अशा अनेक ठिकाणी महाराजांचे पुतळे उभारण्यात आले. परस्त्रीला मातेचा दर्जा देऊन त्यांनी स्त्री सन्मानाचा सर्वोच्च आदर्श जगासमोर ठेवला. न्यायदानाच्या बाबतीत महाराज अत्यंत कठोर आणि निष्पक्ष होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गुजरातमध्ये 'जाणता राजा' महानाटकाद्वारे हे शिवविचार घराघरांत पोहोचवण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी सांगितले की, शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेमागे राजमाता जिजाऊंनी केलेले संस्कार आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची दिलेली प्रेरणा ही मुख्य शक्ती होती. जिजाऊंनी त्यांना देशावरील आक्रमणांची जाणीव करून दिली, ज्यामुळे महाराजांनी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी गुलामगिरीविरुद्ध लढा पुकारला. बाजीप्रभू देशपांडे यांचा पावनखिंडीतील अभूतपूर्व लढा आणि महाराजांची आग्र्याहून झालेली सुटका ही त्यांच्या अफाट बुद्धिमत्तेची व शौर्याची प्रतीके असल्याचे त्यांनी सांगितले. महाराजांचा हा पराक्रमी इतिहास तरुणांनी केवळ वाचू नये, तर तो आचरणात आणावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा देतांना सांगितले की शिवाजी महाराजांनी स्वतःच्या सुखाचा त्याग करून आपले संपूर्ण जीवन जनता, देश आणि धर्मासाठी समर्पित केले. त्यांनी केवळ स्वराज्यच नाही, तर रयतेला स्वाभिमान आणि स्वभाषा दिली. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद देणारा हा राजा जगाच्या इतिहासात अद्वितीय असून ते एकमेव उपभोगशून्य स्वामी होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवरायांच्या पराक्रमाचा सेवक म्हणून काम करत जगभर महाराजांच्या संरक्षण मूल्यांची ओळख करून दिली आहे. आज यूनेस्कोनेही १२ गड किल्लयाचा जागतिक वारशामध्ये समावेश केला. शिवनेरीपासून जिंजीपर्यंत पसरलेले महाराजांचे १२ किल्ले समुद्र, जमीन, डोंगर व पठार अशा सर्व भौगोलिक प्रकारांत उभे असलेले अद्वितीय संरक्षण कवच निर्माण करणारे शिवाजी महाराज एकमेव राजे आहेत असे सांगून भारतीय नौदलाच्या ध्वजावर आणि गणवेशावर शिवरायांची असलेली राजमुद्रा ही प्रत्येक शिवप्रेमीसाठी अभिमानाचा क्षण असल्याचेही ते म्हणाले.

लंडनमधून रघुजी भोसले यांची तलवार भारतात परत आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या प्रयत्नांचे विशेष कौतुक करुन

शिवरायांच्या आदर्शांवर चालत भारताच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आणि त्यांचा तेजस्वी वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन मंत्री ड. शेलार यांनी यावेळी केले.

उत्तरप्रदेश चे मंत्री उपाध्याय यांनी सांगितले की आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची साक्ष देणारे एक भव्य आणि जागतिक दर्जाचे स्मारक साकारले जात आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने 'या आग्र्यातील स्मारकाचे अंतिम टप्प्यात असून उर्वरित कायदेशीर प्रक्रिया लवकरच पूर्ण होईल.

ज्या भूमीवर औरंगजेबाने महाराजांचा अपमान करण्याचा प्रयत्न केला, त्याच ठिकाणी आता शिवरायांचा स्वाभिमान झळकणार आहे. हे स्मारक पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण ठरेल आणि 'मराठा शौर्य दिना'सारख्या उपक्रमांतून महाराजांच्या ऐतिहासिक आग्रा सुटकेच्या स्मृतींना उजाळा दिला जाईल. दोन्ही राज्यांच्या समन्वयातून हे प्रेरणादायी स्मारक लवकरच पूर्णत्वास जाईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद पाटील यांनी केले.



शिवरायांचे गडकोट चढण्याचे विक्रम करणारी शर्विका म्हात्रे हिचा गौरव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या भव्य शिवजयंती सोहळ्यात महाराष्ट्रातून आलेल्या विविध कलाकारांकडून सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनगौरव करणारी गीते,शिवजन्माचा पारंपरिक पाळणा,महाराष्ट्र राज्य गीत गर्जा महाराष्ट्र माझा, शिवाजी महाराजांच्या जीवनावरील नाटिका , शिवछत्रपतींचा पोवाडा आदींचा समावेश होता.

आग्रा किल्लयाच्या पार्श्वभूमीवर सादर होणारा निऑन लाईट आणि लेझर शो हा या कार्यक्रमाचे एक आकर्षण ठरले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत छत्रपती शिवरायांची गौरवगाथा 'इंडियाज गॉट टॅलेंट या स्पर्धेतून प्रसिद्ध झालेले पुण्यातील विवेक पाटील यांनी सादर केली. श्रेया बुगडे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.